# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

शिवाजीनगर- पुणे , ४११ ००५
(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)
संपर्क क्र. ०२० २५५० ७०००/०९    website : www.coeptech.ac.in    Email: registrar@coeptech.ac.in

सीओईपी विद्यापीठ:कुलसचिव कार्यालय/संकीर्ण/पर्यावरण दिन/२०२५/ ३२५        दि. ०५/०६/२०२५

**परिपत्रक:**

विषय :- विद्यापीठ परिसरात (वसतिगृहांसहीत) दि. ०५.०६.२०२५ ***'पर्यावरण दिन'*** पासुन पर्यावरणास हानिकारक असणाऱ्या प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे बाबत.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ प्रशासनाने ५ जून २०२५ रोजी 'पर्यावरण दिन' निमित्त एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या सर्व विभागांमध्ये (वसतिगृहांसहीत) पर्यावरणास हानिकारक असणाऱ्या प्लास्टिक वस्तूंच्या वापर कमी करावा. या उपक्रमाचा उद्देश प्लास्टिक प्रदूषण कमी करणे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता वाढवणे आहे. विद्यापीठाच्या या उपक्रमामुळे परिसरातील प्लास्टिक प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरण संरक्षणात महत्वपूर्ण योगदान मिळेल. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन प्लास्टिक मुक्त परिसर निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी खालील गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे:

**बंदीतील प्रमुख बाबी:**

- प्लास्टिक पाणी बाटल्या, कप, स्ट्रॉ, लंच पॅकेट्स, प्लास्टिक बॅग्स यांचा वापर कमी करावा.
- *सिंगल-यूज प्लास्टिक* (उदा. प्लास्टिकच्या पिशव्या, चमचे, कप, पाण्याच्या बाटल्या इ.) ऐवजी पर्यावरणपूरक पर्याय वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे - जसे की कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, स्टीलचे डबे, स्टील / काचेच्या पाण्याच्या बाटल्या, इत्यादींचा वापर करावा.
- सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिसरात (वसतिगृहांसहीत) पर्यावरणास अनुकूल पर्याय वापरण्याचे प्रोत्साहन.
- विद्यापीठातील सर्व विभागांमार्फत 'प्लास्टिक मुक्त परिसर' या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक आणि जनजागृती कार्यक्रम विभागात राबविण्यात यावेत.
- विद्यापीठ परिसरात (वसतिगृहांसहीत) असणाऱ्या उपहारगृह, मेस (Canteen/Mess) इत्यादी मध्ये पर्यावरणास हानिकारक असणाऱ्या प्लास्टिक पाणी बाटल्या, कप, स्ट्रॉ, लंच पॅकेट्स, प्लास्टिक बॅग्स मध्ये विक्रीस/वापरण्यास येऊ नये. प्लास्टिकच्या ऐवजी पर्यावरणपूरक कागदी पिशव्या, कापडी पिशव्या, स्टीलचे डबे, स्टील / काचेच्या पाण्याच्या बाटल्या, इत्यादी. पर्याय विक्रीस/वापरण्यास ठेवण्यात यावे.
- परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करा.

**आपण सर्वांनी मिळून पर्यावरण रक्षणासाठी एक पाऊल पुढे टाकूया।**
*"प्लास्टिकमुक्त परिसर - हरित पर्यावरणासाठी आपले योगदान देऊ या!"*

कुलसचिव
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

प्रत : माहितीसाठी.

१. मा.कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक.

**विद्यापीठातील-**

२. सर्व अधिष्ठाता.
३. सर्व संचालक.
४. सर्व विभागप्रमुख.
५. सर्व सहयोगी अधिष्ठाता.
६. वित्त व लेखाधिकारी.
७. आहरण व संवितरण अधिकारी.
८. मुख्य कुलमंत्री.
९. प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी.
१०. ग्रंथालय विभाग.
११. जिमखाना विभाग.
१२. बोटक्लब विभाग.
१३. BWC विभाग.
१४. EWC विभाग.
१५. सोयी सुविधा व्यवस्थापक FM
१६. RILL विभाग
१७. विद्यार्थी / आस्थापना विभाग.
१८. DATA CENTRE विभाग.
१९. परिक्षा विभाग.

उपरोक्त सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी, उपहारगृह, मेस (Canteen/Mess) चालक, यांचे निदर्शनास आणून परिपत्रकातील सूचनांचे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच DATA CENTRE विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या उपरोक्त सर्व विभाग प्रमुखांना इमेल द्वारे परीभ्रमित करावे.

२०. विद्यापीठातील सर्व विभागातील व वसतिगृहातील सूचना फलक.